महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर पोलीस

**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**
पोलीस आयुक्त कार्यालय, कॅम्प रोड अमरावती
फोन क्र ०७२१-२५५१००१

---

## अमरावती पोलीस आयुक्तालयातील इंटरनेट सेवा कायदा सुव्यवस्था कारणाकरीता दि. १९/११/२०२१ रोजीचे १५.०० वा पावेतो बंद

-------//--------

दि. १६/११/२०२१

दि. १२/११/२०२१ व दि. १३/११/२०२१ रोजी अमरावती शहरामध्ये दोन समाजामध्ये तेढ निर्माण होउन जातीय तणाव निर्माण झालेला आहे. यामध्ये काही मोर्चेक-यांनी बाजारपेठेतील दुकानांवर दगडफेक करून तोडफोड केली, व दुकानांना , वाहनांना आग लावुन त्यांचे नुकसान केले. अनियंत्रीत जमावाला पांगविण्याकरीता स्थानिक पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच राज्य राखीव पोलीस दलानी बळाचा वापर करून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले. आंदोलना दरमयान काही विकृत लोकांनी सोशल मिडीयावर चुकीचे संदेश प्रसारीत केल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले होते. त्यामुळे मा. अति. मुख्य सचिव, गृह, महाराष्ट्र, मुंबई यांनी दि. १३/११/२०२१ ते १६/११/२०२१ रोजीचे १५.०० वाजे पावेतो अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली होती.

**मा. पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह यांनी अमरावती शहरातील कायदा सुव्यवस्थता अबाधीत रहावी व सोशल मिडीयाव्दारे जनतेमध्ये चुकीचा प्रसार व प्रचार होउ नये म्हणुन अमरावती शहरातील इंटरनेट सेवा पुढील तीन दिवस बंद राहणेकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता त्यानुसार मा. अति. मुख्य सचिव, गृह, महाराष्ट्र, मुंबई यांनी दि. १६/११/२०२१ रोजीचे १५.०० वाजेपासुन ते १९/११/२०२१ रोजीचे १५.०० वाजे पावेतो अमरावती शहर पोलीस** आयुक्तालयातील **मोबाईल नेटवर्क (2G, 3G,4G, CDMA, GPRS ), मॅसेज सर्व्हिसेस, डोंगल सव्हिसेस, केबल इंटरनेट सर्व्हिसेस, वायरलाईन इंटरनेट सर्व्हिसेस, फायबर इंटरनेट सर्व्हिसेस, ब्रॉडबॅंड इंटरनेट सर्व्हिसेस, सेवा बंद ठेवण्याचा आदेश दिलेला आहे.** सदरचा आदेश सर्व स्थानिक इंटरनेट सर्व्हिस प्रोवायडर्स व मुख्य इंटरनेट सर्व्हिसेस प्रोव्हायडर यांना पाठविण्यात आला असुन दि. १९/११/२०२१ रोजीचे १५.०० वाजे पावेतो अमरावती शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात जर इंटरनेट सेवा चालु करण्यात आली तर त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती